# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

# सार्वत्रिक निवडणूक-२०१७



## राजकीय पक्षांची बैठक

दिनांक :- २६/०४/२०१७

**डॉ. योगेश म्हसे,** भा.प्र.से.

**महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी**

## आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# -: निवडणूक कार्यक्रम :-

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका (भिवंडी (ठाणे))

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात
## दिनांक १९/०४/२०१७ रोजी आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | निवडणुकीची सूचना प्रसिध्द करणे. | २९/०४/२०१७ (शनिवार) |
| २ | नामनिर्देशनपत्रे राज्य निवडणूक आयोगाच्या वेबसाईटवर भरण्याचा कालावधी | २९/०४/२०१७ (शनिवार) सकाळी ११.०० ते ०६/०५/२०१७ (शनिवार) दुपारी २.०० पर्यंत (सोमवार दिनांक ०१/०५/२०१७ सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी वगळून) |
| ३ | नामनिर्देशनपत्र स्वीकारणे | २९/०४/२०१७ (शनिवार) ते ०६/०५/२०१७ (शनिवार) सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० (सोमवार दिनांक ०१/०५/२०१७ सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी वगळून) |
| ४ | नामनिर्देशनपत्रांची छाननी | ०८/०५/२०१७ (सोमवार) सकाळी ११.०० पासून |
| ५ | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादि प्रसिध्द करण्याचा दिनांक | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच |

# -: निवडणूक कार्यक्रम :-

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी (ठाणे)

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची / पूर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| ६ | उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक | ११/०५/२०१७ (गुरुवार) दुपारी ३.०० पर्यंत. (बुधवार दिनांक १०/०५/२०१७ सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी उमेदवारी मागे घेता येणार नाही) |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा दिनांक | १२/०५/२०१७ (शुक्रवार) सकाळी ११.०० पासून |
| ८ | अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | १२/०५/२०१७ (शुक्रवार) |
| ९ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | २४/०५/२०१७ (बुधवार) (सकाळी ७.३० ते सायं. ५.३० पर्यंत) |
| १० | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | २६/०५/२०१७ (शुक्रवार) सकाळी १०.०० पासून |
| ११ | शासन राजपत्रात निकाल प्रसिध्द करणे | २९/०५/२०१७ (सोमवार) पर्यंत |

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी (ठाणे)

## ❑ मतदार यादी :-

महाराष्ट्र विधानसभेची दिनांक ०५/०१/२०१७ रोजी अस्तित्वात असलेली मतदार यादी ग्राह्य धरुन प्रभाग निहाय अंतिम मतदार यादी दिनांक ०७/०४/२०१७ रोजी तसेच मतदान केंद्रनिहाय विभागून मतदार यादी सोमवार दिनांक २४/०४/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

## ❑ मतदान केंद्र :-

बहुसदस्यीय प्रभाग पध्दती असल्याने ७५० ते ८०० मतदार असलेले मतदान केंद्र असेल.

## ❑ नामनिर्देशन पत्रे :-

### ❑ नामनिर्देशन पत्रासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-

- मत्ता व दायीत्व तसेच गुन्हेगारी पार्श्वभूमीबाबतचे शपथपत्र.
- अपत्याबाबत शपथपत्र.
- आवश्यक प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती.
- पक्षातर्फे निवडणूक लढवत असल्यास जोडपत्र - १ व जोडपत्र - २.
- जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र.

  (वैधता प्रमाणपत्र नसल्यास पडताळणी समितीकडे अर्ज केल्याची पावती व हमीपत्र)

## ❑ नामनिर्देशनपत्रे सादर करावयाची कार्यपध्दती :-

- नामनिर्देशनपत्रे व शपथपत्रे http://panchayatelection.maharashtra.gov.in या वेबसाईट वर ऑन लाईन भरावयाचे आहेत
- अशी नामनिर्देशनपत्रे प्रिंट करुन व स्वाक्षरी करुन सादर करावयाची आहेत.
- शपथपत्रे आवशकतेनुसार सक्षम प्राधिकाऱ्यासमोर दृढकथन करुन सादर करावी.
- शपथपत्रे स्टॅम्पपेपर वर सादर करण्याची आवश्यकता नाही.
- अनामत रक्कम रोखीने भरणे आवश्यक आहे.
- खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी रुपये ५०००/- (रुपये पाच हजार मात्र) ,
  राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी रुपये २५००/- (रुपये दोन हजार पाचशे मात्र)
  महिला उमेदवारांसाठी रुपये २५००/- (रुपये दोन हजार पाचशे मात्र)

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी (ठाणे)

## ❑ निवडणूक खर्च :-

➢ **राजकीय पक्ष :-**

१. पक्षाचे अधिकृत उमेदवारांमध्ये वाटून दाखविण्यात यावा.

२. STAR प्रचारकांचा प्रवास खर्च उमेदवाराच्या खर्चातून वगळावा.

३. निवडणूक खर्चाची माहिती -
आचारसहिता सुरु झाल्यानंतर २० दिवसांनी, ३५ दिवसांनी व निकाल लागल्यानंतर ०३ दिवसांनी देण्यात यावी.

➢ **उमेदवार :-**

१. प्रत्येक उमेदवारास खर्च मर्यादा रुपये ७ लाख.

२. निवडणूक खर्चासाठी स्वतंत्र बॅक खाते आवश्यक.

३. दैनंदिन खर्च दर दुसऱ्या दिवशी दुपारी २.०० वाजेपर्यंत सादर करावा.

४. एकत्रित खर्चाचा तपशील शपथपत्रावर निकालाच्या तारखेपासून ३० दिवसांत सादर करावा.

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# आदर्श आचारसंहिता

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी (ठाणे)

- **कालावधी** :-

  दिनांक १९/०४/२०१७ पासून निवडणूक निकाल जाहीर होईपर्यंत.

- **आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणी साठी समिती व पथके** :-

  १.निवडणूक संनियंत्रण समिती :- मा. महापालिका आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली .

  २.व्हिडीओग्राफी सर्व्हेलियन्स पथक :- मुख्यालय व निवडणूक निर्णय अधिकारी यांचे स्तरावर.

  ३.भरारी पथक (Flying Squad).

  ४.चेक पोस्ट साठी पथक.

  ५.तक्रार निवारण कक्ष.

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# भाग ३ राजकीय पक्ष / उमेदवार यांचेबाबत

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी (ठाणे)

## इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे प्रचार :-

- इलेक्ट्रॉनिक मिडीयाद्वारे कोणतेही साहित्य प्रसारित करण्यापूर्वी ०५ दिवस आधी अर्ज करुन मा. महापालिका आयुक्त यांचे अध्यक्षते खालील गठीत करण्यात आलेल्या समितीकडून सदर साहित्य तपासून प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

- प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक तसेच **प्रिंट मिडियाव्दारे** देखील प्रचारावर बंदी राहील. यामध्ये **एसएमएस अथवा व्हॉटस्‌अॅप, फेसबुक, ट्वीटर** इत्यादी मेसेजचा देखील समावेश होतो.

- राजकीय स्वरुपाच्या मुलाखती किंवा इतर कार्यक्रमाचे प्रसारण करताना केबल नेटवर्क किंवा स्थानिक वाहिनी तसेच सहभागी होणारे राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांनी राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या आचारसंहितेचे कटाक्षाने पालन करणे अत्यावश्यक आहे.

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

## ❑ निवडणूक प्रचारासंदर्भात उमेदवाराने भित्तीपत्रके / बॅनर / फलक लावण्याबाबत :-

- ➢ याबाबत सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक कायदा १९८४ तसेच खाजगी व सरकारी मालमत्ता विरुपण कायदा १९९६ च्या तरतुदी लागू राहतील.
- ➢ यासाठी खाजगी मालमत्तेच्या वापरासाठी मालकाची लेखी परवानगी आवश्यक आहे.
- ➢ निवडणुकीचे पोस्टर व बॅनर म्हणून प्लॅस्टिकचा वापर करण्यास निर्बंध आहेत.
- ➢ पोस्टर, बॅनर इत्यादी लावणेबाबत परवानगीचा कालावधी जाहीर प्रचाराचा कालावधी संपेपर्यंतच्या मुदतीकरिता राहील.
- ➢ सदर मुदत संपल्यानंतर सदर प्रचाराचे साहित्य संबंधित उमेदवार / राजकीय पक्षाने काढून टाकणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांनी काढले नाही तर संबंधित उमेदवारांवर मालमत्ता विरुपण कायद्यानुसार गुन्हा दाखल केला जाईल व असे प्रचार साहित्य महापालिकेमार्फत काढून टाकून त्याकरिताचा खर्च उमेदवाराच्या खर्चामध्ये समाविष्ट करण्यात येईल.

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी (ठाणे)

- **निवडणूक प्रचारादरम्यान प्राण्यांचा वापर करण्यास बंदी आहे.**
- **निवडणूक प्रचारामध्ये लहान मुलांचा वापर करण्यास प्रतिबंध** :- निवडणूक प्रचारात, मिरवणुकीत १४ वर्षाखालील मुलांना सामील करण्यात येऊ नये.
- **प्रचार साहित्यावर मुद्रक व प्रकाशकाचे नाव व पत्ता छापणेबाबत** :-
  छापलेल्या किंवा कोणत्याही प्रक्रियेव्दारे प्रती काढलेल्या (हाताने प्रती काढण्याखेरीज) निवडणुकीच्या प्रत्येक प्रचार साहित्याच्या प्रतीवर पुढील बाजूला प्रचार साहित्यावर प्रतींची संख्या, प्रत क्रमांक, मुद्रक व प्रकाशकाचे नाव व पत्ता छापणे बंधनकारक आहे.
- **प्रचारफेरीतील वाहनांबाबत** :-
  सक्षम प्राधिका-याची परवानगी घेऊन उमेदवारास प्रचार फेरीसाठी / मिरवणुकीसाठी **जास्तीत जास्त ०३ वाहने वापरता** येतील.
- **प्रचार कार्यालयांची संख्या** :-
  - प्रचार कार्यालयांच्या संख्येबाबत मर्यादा काढून टाकण्यात आली आहे.
  - प्रचार कार्यालयांमुळे नागरिकांची गैरसोय होणार नाही याची खबरदारी घेऊन व पूर्व परवानगी घेऊन उघडावीत.
  - प्रचार कार्यालये सकाळी ६.०० ते रात्रौ. १०.०० पर्यंत सुरु ठेवण्याची मुभा आहे.

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी (ठाणे)

- **नामनिर्देशनपत्र भरण्यासाठी :-**
  - निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या आवारात **फक्त चार (०४) व्यक्तींना प्रवेश** करण्याची परवानगी देण्यात येईल.
  - मिरवणुकीने आल्यास कार्यालयापासून १०० मीटर वर मिरवणूक थांबवावी.
- **सभा** :-
  - सभेसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांची परवानगी :- सभा स्थळ - सहाय्यक आयुक्त.<br>सभा - पोलिस अधिकारी
  - ध्वनीक्षेपकाच्या वापराबाबत ४८ तास अगोदर सक्षम पोलिस अधिकाऱ्यांची स्वतंत्र परवानगी घ्यावी.
  - प्रस्तावित सभेची जागा व वेळ संबंधित पोलिस अधिकाऱ्यांना ४८ तास अगोदर कळवावी.
  - सभेच्या जागेत प्रतिबंधक आदेश लागू आहेत किंवा कसे याबाबत खात्री करुन घ्यावी.
  - अन्य पक्ष वा उमेदवाराच्या सभेमध्ये अडथळा उत्पन्न करु नये.

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# मिरवणूका

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी (ठाणे)

- **मिरवणुकीची वेळ व जागा निश्चितीबाबत** :-
  - अशी वेळ व जागा पक्ष किंवा उमेदवार अगोदर निश्चित करील.
  - कार्यक्रमासंबंधी सर्व माहिती स्थानिक पोलिस प्राधिकाऱ्यांना माहिती आगाऊ कळवेल.
- **वाहतूक नियंत्रणाबाबत** :-
  - सभा मिरवणूक इत्यादीच्या वेळी उमेदवारांनी / पक्षांनी त्यांचे कार्यकर्ते अथवा स्वयंसेवक नेमून रहदारीचे नियंत्रण अशा प्रकारे करावे जेणेकरुन सभा अथवा मिरवणुकीचा त्रास सर्वसामन्य जनतेला होणार नाही.
- **मिरवणुकी दरम्यान बाळगावयाच्या वस्तूंबाबत** :-
  - ज्यांचा दुरुपयोग केला जाऊ शकेल अशा, धारदार वस्तू, शस्त्रे किंवा विस्फोटक साहित्य जवळ बाळगता येणार नाहीत.
- **प्रचार फेरीतील खर्चाबाबत** :-
  - जास्तीत जास्त ०३ वाहनांचा समावेश करण्यात येईल.
  - प्रचार फेरी अथवा मिरवणूक ज्या प्रभागांमधून जाईल त्या सर्व प्रभागांमधील त्या पक्षाच्या किंवा आघाडीच्या उमेदवारांमध्ये तो खर्च विभागून दाखविण्यात येईल.

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

# मतदानाचा दिवस

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी (ठाणे)

## ❑ मतदारांना द्यावयाच्या ओळखचिठ्ठया :-

- ओळखचिठ्ठया स्वच्छ पांढऱ्या कागदाच्या असाव्यात.
- त्यावर कोणत्याही उमेदवाराचे / राजकीय पक्षाचे चिन्ह व नाव नसावे.

## ❑ उमेदवाराचे तात्पुरते कार्यस्थान (उमेदवार / पक्षामार्फत चिठ्ठी वाटपाकरिता लावण्यात येणारे टेबल) :-

- सहाय्यक आयुक्तांची परवानगी घ्यावी.
- उमेदवारांनी मतदान केंद्रापासून २०० मीटर लांब असावे.
- कार्यस्थळाच्या भागावर भित्तीपत्रक, ध्वज, चिन्हे किंवा इतर प्रचार साहित्य लावू नये.
- खाद्यपदार्थांचे वा अन्य वस्तुंचे वाटप करु नये.

## ❑ मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापराबाबत :-

- प्रत्येक उमेदवारास स्वत:च्या किंवा निवडणूक प्रतिनिधीच्या वापरासाठी दोन वाहने वापरण्याचा अधिकार असेल.
- ही वाहने त्याच्या मतदारसंघातच वापरता येतील.

## ❑ मतदान केंद्रामध्ये प्रचार साहित्य नेण्यावरील निर्बंध :-

- मतदानाच्या दिवशी कोणतेही प्रचार साहित्य मतदार केंद्रामध्ये आणता येणार नाहीत.

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी (ठाणे)

- **मतदान केंद्रामध्ये उमेदवाराच्या प्रवेशाबाबत** :-
  - उमेदवार / उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी यांना मतदानाचे निरीक्षणासाठी मतदान केंद्राचे आत तीन मतदारांचे मतदान होईपर्यंतच थांबता येईल.
  - एका केंद्रामध्ये संपूर्ण मतदानाच्या कालावधीत जास्तीत जास्त तीन वेळा जाता येईल.

- **मतदारांची ने - आण करण्यास वाहनांचा वापर करणेस बंदी** :-
  - उमेदवारास अथवा पक्षाला मतदारांची ने-आण करण्यासाठी कोणत्याही वाहनांचा वापर करता येणार नाही.

- **वाहनांच्या गैरवापराबाबत** :-
  - निवडणूक लढविणारे उमेदवार व त्यांचे इतर पक्ष नेते यांच्या सोबतच्या व्यक्तींकडून वापरण्यात येणाऱ्या वाहनांद्वारे गैर वा गुन्हेगारी कृत्य होणार नाही याची संबंधित उमेदवार व पक्षांनी दक्षता घ्यावी.

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी (ठाणे)

- **निवडणूक आचारसंहितेमध्ये येणाऱ्या सार्वजनिक सणांमधील आचरणाबाबत:-**
  - राजकीय पक्षाचे नेते, उमेदवार, कार्यकर्ते या सण / उत्सवाच्या कार्यक्रमामध्ये व्यक्तिगतरित्या सहभागी होऊ शकतात.
  - उमेदवार सण / उत्सवाच्या एखाद्या मंडळाचे विश्वस्त किंवा पदाधिकारी असल्यास त्याचे / तिचे नाव कार्यक्रम पत्रिकेवर राहू शकते. परंतु तेथे पक्षाचा किंवा उमेदवार असलेच्या प्रभागाचा उल्लेख नसावा.
  - या सणांमध्ये कोणत्याही राजकीय नेत्यांचा / उमेदवाराचा सत्कार आयोजित करण्यात येऊ नये.
  - या सण / उत्सवाच्या निमित्ताने कोणत्याही राजकीय नेत्याने / उमेदवाराने कोणत्याही वस्तूंचे वाटप करु नये.
  - सण / उत्सव निमित्त लावण्यात आलेल्या पोस्टर्स, बॅनर्सवर उमेदवारांचा फोटो असू शकेल तथापि, त्या बॅनर्स पोस्टर्स वर प्रचाराचा उल्लेख असू नये.
  - निवडणूक आचारसंहिता कालावधीमध्ये भोजनावळ / जेवणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करु नये.

राज्य निवडणूक आयोग
महाराष्ट्र

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी (ठाणे)

# धन्यवाद !!!